क्र.का-४/प्र.क्र. २४९/२००६/१८१८/०७
नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक,
महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय, पुणे-१
दिनांक :- ०४/ १२ /२००७

003.7.

विषय - महाराष्ट्र नोंदणी (सुधारणा) नियम २००५.

संदर्भ - १) नोंदणी महानिरीक्षक कार्यालयाची अधिसुचना क्रमांक नोमनि ४/प्र.क्र.२४९/ ९२७/२००६ दिनांक २७/६/२००६.

२) नोंदणी महानिरीक्षक कार्यालयाचे परिपत्रक क्रमांक का.४/नियम ४४/प्र.क्र.२४९/ १२२८/०६ दिनांक २३/८/२००६.

**परिपत्रक :-**

महाराष्ट्र नोंदणी (सुधारणा) नियम २००५ अन्वये नोंदणी नियम १९६१ मधील नियम ४४ मध्ये करण्यांत आलेल्या सुधारणांच्या अंमलबजावणीबाबत सविस्तर मार्गदर्शक सूचना संदर्भित परिपत्रकान्वये सर्व दुय्यम निबंधक यांना आल्या आहेत.

नोंदणीस दाखल झालेल्या दस्तऐवजाद्वारे उद्देशित असणा-या व्यवहाराबाबत केंद्र शासन अथवा राज्य शासन यांच्या कोणत्याही कायदयान्वये निर्बंध असेल तर त्या कायदयातील सक्षम प्राधिकारी यांचेकडील परवानगी अथवा ना-हरकत प्रमाणपत्र त्या दस्तासोबत जोडणे उक्त नियमानुसार आवश्यक झालेले आहे. या कार्यालयाचे असे निदर्शनास आले आहे की, काही ठिकाणी स्थानिक स्वराज्य संस्था अथवा तत्सम प्राधिकरणे दुय्यम निबंधकांना त्यांच्या ना-हरकत प्रमाणपत्राशिवाय दस्त नोंदणी न करण्याबाबत कळवितात व दुय्यम निबंधक अशा दस्तऐवजांची नोंदणी उक्त ना-हरकत प्रमाणपत्राचे कारणास्तव नाकारतात.

याबाबत सर्व दुय्यम निबंधकाना कळविण्यात येते की,

१. अशारितीने कळविण्यात आलेल्या सुचनांमध्ये कायदेशीर तरतुदीचा स्पष्ट उल्लेख केलेला असेल तर दुय्यम निबंधकांनी उक्त कायदयातील तरतुदी विचारात घेऊन त्यानुसार ना-हरकत प्रमाणपत्राची मागणी पक्षकारांकडे करावी.

२. जर अशा सुचनांना कोणत्याही कायदेशीर तरतुदींचा आधार नसेल तर दुय्यम निबंधकांनी सदर सुचना सह जिल्हा निबंधक यांचे निदर्शनास आणून दयावी. सह जिल्हा निबंधक यांनी संबंधित स्थानिक स्वराज्य संस्था/प्राधिकरणाशी संपर्क साधून त्यांना नोंदणी अधिनियम व नियमातील तरतुदी निदर्शनास आणून दयाव्यात व त्यानुसार दुय्यम निबंधक यांना योग्य त्या सुचना दयाव्यात.

कोणत्याही कायदयान्वये प्रतिबंधित नसलेला दस्तऐवज नोंदणी करण्याचे विनाकारण नाकारला जाणार नाही व संबंधित पक्षकारांना नाहक त्रास होणार नाही आणि शासन महसूलाचे नुकसान होणार नाही याची दुय्यम निबंधक आणि सह जिल्हा निबंधक यांनी काटेकोरपणे दक्षता घ्यावी.

सही/-(रामराव शिनगारे)
नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक
महाराष्ट्र राज्य पुणे.

प्रति,
सर्व दुय्यम निबंधक यांना (सह जिल्हा निबंधक यांचेमार्फत).

प्रत :-

१. मा.प्रधान सचिव, महसूल व वन विभाग, (म-१) यांना त्यांनी दिलेल्या मार्गदर्शनपर सूचनांचे अनुषंगाने सादर.
२. सर्व नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक.
३. सर्व सह जिल्हा निबंधक.
४. सर्व कार्यासन अधिकारी, नोंदणी महानिरीक्षक कार्यालय, पुणे.

निर्गमित
उपनोंदणी महानिरीक्षक (मुख्यालय),
महाराष्ट्र राज्य पुणे.